# वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना स्वित्झर्लंडतर्फे प्रतिष्ठेची शिष्यवृत्ती

**नाशिक, ता. २९ :** एबीबी इंडिया लिमिटेड कंपनीच्या जजेन डॉर्मन फाऊंडेशन, स्वित्झर्लंडतर्फे दिली जाणारी प्रतिष्ठेची शिष्यवृत्ती के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांना जाहीर झाली आहे. एआयडीएस विभागातील कुंदन सुर्यवंशी, रोबोटिक्स अँण्ड ऑटोमेशन विभागातील चैताली देशमुख आणि कॉम्प्युटर विभागातील श्रीकृष्ण जाधव या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ मिळावे यासाठी एबीबी इंडिया बहुराष्ट्रीय कंपनीच्या फाउंडेशनतर्फे शिष्यवृत्ती दिली जाते. यामध्ये अभियांत्रिकीच्या पहिल्या वर्षापासून शेवटच्या वर्षापर्यंत महाविद्यालयाचे शुल्क, राहण्याचा खर्च आणि आवश्यक साहित्य यांचा समावेश असतो. एबीबी नाशिकचे अध्यक्ष गणेश कोठावदे आणि प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांचे पालक, प्रा. पी. टी. कडवे, डॉ. पी. जे. पवार, डॉ. स्नेहल कमलापूर, डॉ. दर्शन मेधने आणि डॉ. पी. के. शहाबादकर उपस्थित होते. शिष्यवृत्ती भारतात केवळ तीन निवडक महाविद्यालयांना मिळते, त्यापैकी के.के. वाघ महाविद्यालय एक आहे. प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी सांगितले की, यंदा २०२४-२५ च्या बॅचच्या तीन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

Sakal 30-09-2025